Impact Factor (SJIF): 6.092 E-ISSN: 2583-1615

International Journal of Research in Academic World

**Received**: 10/July/2024 **IJRAW:** 2024; 3(8):179-182 **Accepted:** 19/August/2024

# भारताचा जी.डी.पी. आणि वित्तीय तूट पूर्व आणि आज: एक अभ्यास

**[*1]डॉ. मारोती विठ्ठलराव भोसले**

[*1]प्रोफ़ेसर, अर्थशास्त्र विभाग प्रमुख, कै. डॉ. शंकरराव सातव कला व वाणिज्य महाविद्यालय कळमनुरी, ता, कळमनुरी, जि, हिंगोली, महाराष्ट्र, भारत।

**सारांश**

आणि खाजगी क्षेत्राचे अस्तित्व असते. भारताची अर्थव्यवस्था तीन क्षेत्रात विभागलेली आहे.

i). प्राथमिक क्षेत्र (कृषीक्षेत्र)
ii). द्वितीय क्षेत्र (उद्योग क्षेत्र)
iii). तृतीय क्षेत्र (सेवा क्षेत्र)

एखाद्या विशिष्ट आर्थिक वर्षामध्ये या तीनही क्षेत्रातून किती स्थूल राष्ट्रीय उत्पन्न व त्यातुन शुद्ध राष्ट्रीय उत्पन्नाची प्राप्ती होते त्यास स्थूलपणे सकल घरेलु उत्पाद (जी.डी.पी.) असे म्हणतात. दरवर्षी साधारणपणे देशांचे अंदाजपत्रक । फेब्रुवारीला सादर केले जाते. साधारणपणे एका विशिष्ट वर्षात सरकारला मिळालेले उत्पन्न व सरकारचा होणारा खर्च यामध्ये जी तफावत किंवा फरक असतो त्यास वित्तीय तूट असे म्हणतात. आतापर्यतच्या सर्वच अंदाजपत्रकात वित्तीय तुट ही कायमची असते।

**मुख्य शब्द:** जी.डी.पी., भारताची अर्थव्यवस्था, वित्तीय तुट आदि।

## प्रस्तावना

भारताची अर्थव्यवस्था ही कृषीप्रदान आहे. या अर्थव्यवस्थेमध्ये तीनही क्षेत्राचे वर्चस्व आहे.

i). कृषीक्षेत्र: यामध्ये प्रामुख्याने पिके, पशुधन, वानिकी व लाकूडतोड, मत्स्यव्यवसाय यांचा समावेश होतो.
ii). उद्योग यामध्ये खाणकाम, कारखानदारी, वीज गॅस व पाणीपुरवठा, बांधकाम व्यापार हॉटेल्स
iii). आणि रेस्टॉरन्टन्स इत्शदीचा समावेश होतो.
iv). सेवाक्षेत्र यामध्ये वाहतूक साठवणूक व संचार, रेल्वे, 1 वित्तपुरवठा, बीमा, रियल इस्टेट, बैंकिंग, लोकप्रशासन व सरंक्षण अशा विविध क्षेत्रातील विभागणी व त्यातील वेगवेगळे घटक सांगता येतील. वरील सर्व क्षेत्रातून विशिष्ट आर्थिक वर्षात ते शुद्ध उत्पत्र प्राप्त होते त्यास जी.डी.पी. म्हणतात. तसेच दरवर्षी आर्थिक वर्ष । फेब्रुवारीला अंदाजपत्रक सादर केले जाते. त्यामध्ये शासनाला मिळालेले उत्पन्न व शासनाचा होणारा खर्च यामधील फरकाला वित्तीय तूट असे म्हणतात. भारताने कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारल्या कारणाने वित्तीय तूट हो दिवसेंदिवस

**वाढतच चालली आहे**

देशभरातल्या उत्पादन व सेवासंदर्भातील आकडेवारी केंद्रीय सांख्यकी जमा करते. यासाठी हो संस्था विविध निर्देशांकावर नजर ठेवून असते. यामध्ये औद्योगीक उत्पादन निर्देशांक आणि ग्राहक किंमत निर्देशांकाचा समावेश होतो.

## जी.डी.पी. चा अर्थ

एका विशिष्ट आधिक वर्षात निर्माण होणाऱ्या वस्तू व सेवा यांची मूल्य म्हणजे जी.डी.पी. होय. सकल देशांतर्गत उत्पादन (जीडीपी) महणजे एखाद्या देशाच्या भौगोलिक सिमामध्ये उत्पदीत वस्तू आणि सेवांचे विशिष्ट कालावधीत साधारणपणे एक वर्ष कालावधीतील अंतिम मूल्य होय.

स्थूलपणे एका विशिष्ट वर्षात तीनही क्षेत्रात (कृषी, उद्योग, सेवा) निर्माण होणाऱ्या वस्तु व सेवाची मूल्य होय.

आंतर-वर्षे तुलना सक्षम करण्यासाठी राष्ट्रीय खात्याचे मूळ वर्षे निवडले आहे. हे क्रयशक्तीमधील बदलाची कल्पना देते आणि चलनवाढ समायोजीत वाढीच्या अंदाजाची गणना करण्यास अनुमती देते. शेवटच्या मालोकेने 2004-05 पासून आधार बदलून 2011-12 केला आहे.

***Corresponding Author:** डॉ. मारोती विठ्ठलराव भोसले

### वित्तीय तुट अर्थ

एका विशिष्ट वर्षात सरकारला प्राप्त होणारे उत्पन्न व सरकारचा होणारा खर्च यामध्ये ती तफावत तयार होते. त्यास वित्तीय तुट असे म्हणतात.

वित्तीय तुट हो सरकारच्या उत्पन्नातील खर्चाच्या तुलनेने एक कमतरता आहे. सरकारचे एकूण उत्पन्न आणि त्याद्वारे केलेला एकूण खर्च यात हा फरक आहे. ही तफावत सरकारी कर्जाने भरून काढली जाते. राजकोषीय तूट हो नेहमीच महागायी असते. नवीण चलन जारी करून तुट ही त्याच कालावधीत झालेल्या एकूण खर्चातून सरकारला आर्थिक वषांत मिळालेला एकूण महसूल बजा करून मोजला जातो.

वित्तीय तूट हो महसूली उत्पन्न व महसूली खर्चाच्या माध्यमातून मोजली जाते.

स्वतंत्र भारतातील पहिला अर्थसंकल्प अर्थमंत्री आर. के. षण्मुखम चेट्टी यांनी मांडला त्या

अंदाजपत्रकात एकून खर्च 197.39 कोटी रू. राखून ठेवण्यात आला होता. त्यापैकी अंदाजे 92.74 कोटी रूपये संरक्षण सेवासाठी वाटप करण्यात आले. केंद्रीय पहिला अर्थ संकल्प 26 नोव्हेंबर 1947 ! रोजी सादर केला होता.

प्रथम 31 एप्रिल ते । मार्च असे आर्थिक वर्षे व त्याच काळात अंदाजपत्रकाची मांडणी केली जायची. विद्यमान अर्थमंत्री निर्मला सीतारमन 1 फेब्रु. 2024 रोजी त्यांचा विक्रमी सहावा अर्थसंकल्प सादर केल्याने ही परंपरा मजबूत होत चालली आहे. अलीकडील काळात अर्थसंकल्प । फेब्रुवारीला सादर केला जातो.

### उद्देश

i). देशातील जीडीपी चा अभ्यास करणे.
ii). देशातील वित्तीय तुट अभ्यासणे
iii). वित्तीय तुटीमुळे जीडीपी वाढतो.
iv). वित्तीय तुटीमुळे महागायी वाढते.

### गृहितके

i). वित्तीय तुटीमुळे देशांतर्गत जीडीपी मध्ये वाढ होते.
ii). वित्तीय तुटीमुळे देशामध्ये महागायी वाढते.
iii). जीडीपी वाढल्यामुळे आर्थिक विकास होतो.
iv). वित्तीय तुट ही वाढतच आहे.
v). जीडीपी वाढल्यामुळे लोकांच्या राहणीमानात वाढ झाली आहे.

जानेवारी 2015 पासून जोडीपी मोजमापा संदर्भात काही बदल झाले आहेत. भारतात हेडलाईन जीडीपी. म्हणून घटक किमतीला मोजलेल्या जीडीपी चा वापर केला जात असे. मात्र 2015 पासून त्याऐवनी स्थोर बाजार किमतीला मोजलेल्या जीडीपी चा वापर करण्यात आला, स्कूल मूल्यबंधीताचे मोजमाप करण्यासाठी मूलभूत किमतीचा स्वीकार करण्यात आला आहे. मुलभूत किंमतीमध्ये केवळ उत्पादन कर व अनुदानाचा विचार केला जातो. उत्पादन कर व अनुदानाचा विचार केला जात नाही. घटक किमतीत या दोन्ही प्रकारच्या कर व अनुदानाचा विचार केला जातो.

भारताच्या जीडीपी चे क्षेत्रीय वितरण

केंद्रीय सांख्यिकी संगटन (सीएसओ) ने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार गेल्या काही वर्षामध्ये

**तालिका 1:** भारताच्या जीडीपी मधील कृषी, उद्योग व सेवा क्षेत्राचा हिस्सा पुढीलप्रमाणे

| अ.क्र. | वर्ष | कृषिक्षेत्र % हिस्सा | उद्योग क्षेत्र % हिस्सा | सेवा क्षेत्र % हिस्सा |
|---|---|---|---|---|
| 1. | 1950-51 | 53.1 | 16.6 | 30.3 |
| 2. | 1960-61 | 48.7 | 20.5 | 30.8 |
| 3. | 1970-71 | 42.3 | 24.5 | 33.8 |
| 4. | 1980-81 | 36.1 | 25.9 | 38.8 |
| 5. | 1990-91 | 29.6 | 27.7 | 42.7 |
| 6. | 2000-01 | 22.3 | 27.3 | 50.4 |
| 7. | 2005-06 | 18.3 | 28.0 | 53.8 |
| 8. | 2010-11 | 14.6 | 27.9 | 57.5 |

वरील तक्यावरून असे दिसून येते की, भारताच्या जीडीपी मधील कृषी क्षेत्राचा हिस्सा सतत कमी होत गेला व उद्योगक्षेत्रांचा हिस्सा स्वोर आहे. भारताची अर्थव्यवस्था कृषी आधारीत अर्थव्यवस्थेकडून सेवाधारित बनत आहे. सेवा क्षेत्राचा हिस्सा कृषी व उद्योग क्षेत्राच्या एकूण हिस्यापेक्षा अधिक आहे जीडीपी मधील कृषी क्षेत्राचा हिस्सा कमी होणे हा भारतीय अर्थव्यवस्थेतील सकारात्मक संरचनात्मक बदल दर्शवतो.

**तालिका 2:** 2018-19 मध्ये सर्वाधिक निवळ राज्य जी.डी.पी. असलेली राज्य पुढीलप्रमाणे

| अ.क्र | राज्य | कोटी रुपये |
|---|---|---|
| 1. | महाराष्ट्र | 23,32,992 कोटी रू |
| 2. | उत्तर महाराष्ट्र | 14,91,311 कोटी रू |
| 3. | तमिळनाडू | 14,65,361 कोटी रू |
| 4. | कर्नाटका | 14,09,126 कोटी रू |
| 5. | गुजरात | 13,22,936 कोटी रू |

वरील राज्यात सर्वाधिक जी.डी.पी. आहे.

अर्थ संकल्पाच्या रचनेमध्ये महसूली अर्थसंकल्प महत्वाचा असतो. महसूनी अर्थसंकल्पात सरकारची महसूली जमा व त्यातुन भागवायची महसूली खर्च दर्शविलेला असतो. महसूलो जमा यामध्ये प्रामुख्याने अ. कर उत्पन्न । उत्पन्नावरील कर 2 संपत्ती व भांडवली व्यवहारावरील कर 3 वस्तू व सेवावरील कर व करेत्तर उत्पन्न

i). राजकोषीय सेवा चलणी नोटा व नाण्यावरील नफा
ii). व्याज उत्पन्नः घटक राज्ये व केंद्रशासीत प्रदेशांना दिलेल्या कर्जावरील व्याज
iii). नफा व लाभांश, आर.बी.आय, सार्वजनिक बँका, एल.आय.सी., सार्वजनीक उद्योग इ.नफा.

### महसूली खर्च

i). केंद्र पुरस्कृत व केंद्रीय योजनावरील महसूली खर्च, उदाः सामाजिक मालमत्तेच्या देखभालीवरील खर्च
ii). घेतलेल्या कर्जावरील व्याज खर्च
iii). संरक्षणाचा महसुली खर्च
iv). अनुदाने (अन्न, खते, पेट्रोलियम, अनुदाने)

v). नागरी प्रशासन खर्च, पगार, पेन्शन, कार्यालयीन खर्च इत्यादी राज्य सरकारे व केंद्र प्रदेशांना दिलेली अनुदाने.

याशिवाय भांडवलो अर्थ संकल्प व भांडवली खर्च याचाहो अर्थसंकल्पात समावेश होतो.

### अर्थसंकल्पाचे प्रकार

i). **समतोल अर्थसंकल्प:** जेव्हा सरकारने आपल्या अर्थसंकल्पात पुढील आर्थिक वर्षासाठी अंदाजीत उत्पन्न व अंदाजीत खर्च दोन्ही सारखेच मांडलेले असतात. तेव्हा त्या अर्थसंकल्पास समतोल अर्थसंकल्प असे म्हणतात.

ii). **शिलकी अर्थसंकल्प:** जेव्हा सरकारणे आपल्या आर्थिक अर्थ संकल्पात पुढील आर्थिक वर्षासाठी अंदाजीत उत्पन्न, अंदाजीत खर्चापेक्षा जास्त मांडलेले असते तेव्हा त्या अर्थसंकल्पास शिलकी अर्थसंकल्प म्हणतात.

iii). **तुटीच्या अर्थसंकल्प:** जेव्हा सरकारने आपल्या अर्थसंकल्पात पुढील आर्थिक वर्षासाठी अंदाजीत उत्पन्नापेक्षा अंदाजीत खर्च जास्त मांडलेले असतो तेव्हा त्या अर्थसंकल्पास तुटीचा अर्थसंकल्प असे म्हणतात.

भारतासारख्या विकसनशील देशात तुटीचाच अर्थसंकल्प सादर केला जातो. त्याचे कारण तुटीच्या अर्थसंकल्पामुळे आर्थिक विकासास चालना मिळते. विकसनशील देशात बऱ्याचदा मनुष्यबळ व नैसर्गिक साधनसामुग्री उपलब्ध असते मात्र प्रमुख अडचण वित्तीय साधनसामुग्रीची असते. अशावेळी गुंतवणुकीसाठी मोठा खर्च दाखवून अर्थसंकल्पात तुट निर्माण केली जाते. सरकार ही गुंतवणुक प्राधान्य क्षेत्रात व आवश्यक तेथेच करते. (उदा. पायाभूत उद्योग निर्माती इत्यादी) त्यामुळे पैशाची मागणी वाढते राष्ट्रीय उत्पन्न व दरडोई उत्पन्न वाढल्याने लोकांची वस्तु व सेवांची मागणी व पर्यायाने त्याच्या किंमती वाढतात. त्यामुळे उद्योजकांना उत्पादन वाढवीण्यास प्रेरणा मिळते.
केंद्र सरकारचे महसूली उत्पन्न आणि खर्च यातील दरी असणारी देशाची वित्तीय तुट एप्रिल ते डिसेंबर 2023 चा 9 महिन्याचा कालावधी 9.82 लाख कोटी रूपयावर पोहचली आहे. संपूर्ण आर्थिक वर्षासाठी सरकारने निर्धारित केलेल्या अंदाजाच्या तुलनेत हे प्रमाण 555 आहे. त्याआधीच्या नोव्हेंवर महिन्यात तुटीची पातळी 9.07 लाख कोटी रूपयावर होतो. संदर्भ: लोकसत्ता । फेब्रुवारी 2024.

### तुटीच्या संकल्पना

i). **महसुली तुट:** महसुली तुट. महसुली उत्पन्न महसुली खर्च 1970 च्या दशकात मध्यापर्यंत महसूली खात्यावर शेष होता. मात्र त्यानंतर तुट आढळून येते.

ii). **अर्थसंकल्पीय तुट:** अर्थसंकल्पीय तुट. एकूण उत्पन्न – एकूण खर्च. 1950-51 पासून भारतात अर्थसंकल्पीय तुट आढळून येते. 1997-98 च्या सुखमाय चक्रवती यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय चलन व्यवस्था विषयक समिती ज्या शिफारसीनुसार वित्त मंत्रालयाने तुटीच्या अर्थभरण्यासाठी या तुटीचा वापर करणे सोडनू दिले. तेव्हापासून ही तुट शून्य दाखविले जाते. म्हणजेच एकूण जमा एकूण खर्च सारखेच दाखविले जातात.

iii). **राजकोषीय तुट:** राजकोषीय तूट एकुण खर्च राजकोषीय तूट एकूण खर्च (महसुली जमा व कर्ज पुर्नप्राप्ती द्य इतर भांडवली मिळकत) किंवा (महसूली जमा द्य कर्जेत्तर भांडवली जमा) किंवा राजकोषीय तूट सरकारची करज उभारणी हा सरकारची इतर देणी.

राजकोषीय तुट म्हणजे सरकार आपल्या एकूण उत्पन्नापेक्षा किती जास्त खर्च करीत आहे ती रक्कम होय. हा जास्तीचा खर्च भागविण्यासाठी सरकारने एका वर्षात घेतलेली एकूण कर्ज म्हणजेच सरकारची राजकोषीय तुट होय. राजकोषीय तुट रकमेमध्ये तसेच जीडीपीच्या टक्केवारीमध्ये दर्शविली जाते.
राजकोषीय तुट म्हणजे सरकारच्या एकूण जमेपेकी अशी रक्कम जी भविष्यात सरकारने परत करावयाची असते. म्हणून तिला सरकारवर कर्ज निर्माण करणारी जमा असे म्हणतात.

### राजकोषीय तुटीचे दुष्परिणाम

i). सरकारी खर्चात प्रचंड वाढ सरकार आपला महसूली खर्च महसूली उत्पन्नातून भागविण्यास असमर्थ ठरतो.

ii). राजकोषीय तुटीमुळे चलनवाढ होते. त्यातुन वस्तु व सेवांच्या किंमती वाढतात. सर्वसामान्य माणसाला जीवन जगता येणार नाही

iii). सक्तीची बचत–किंमत वाढीमुळे निश्चित उत्पन्न असणाऱ्या लोकांचा वस्तू व सेवांचा उपभोग कमी होतो. त्यामुळे सक्तीची बचत होते. उच्च उत्पन्न गटातील लोकांचा उपभोग मात्र वाढत जातो.

iv). खाजगी गुंतवणुकीच्या संरचनेत बदल होतो श्रीमंत लोकांकडील पैसा वाढल्याने चैनीच्या वस्तुची मागणी वाढते. त्यामुळे गुंतवणुकीचा प्रवाह चैनीच्या वस्तुचे उत्पादन, नागरी बांधकाम, सट्टेबाजी इत्यादी अनुउत्पादक बायोकडे वळतो. शेती, उद्योग इत्यादी आवश्यक क्षेत्रांना गुंतवणुकीचा दुय्यम दर्जा मिळतो.

v). बँकांची पनिमीती चाढते: बँकाकडे ठेवीमध्ये वाढ झाल्याने त्यांची कर्ज देण्याची क्षमता वाढून त्यांची पतनिमीती प्रक्रिया वाढीस लागते.

### निष्कर्ष

i). वित्तीय तुटीमुळे देशामध्ये सकल घरेलु उत्पादन वाढले आहे.

ii). पैसा संख्यात्मक दृष्ट्या वाढतो व चलनवाढ होते.

iii). सकल घरेलू उत्पादनामुळे आर्थिक विकास होतो. लोकांच्या राहणीमानात वाढ होते. म्हणजेच पौष्टीक आहार, उत्तम आरोग्य, आर्युमान वाढते व उच्च शिक्षणाचे प्रमाण वाढते.

iv). भारतासारख्या विकसनशील देशांसाठी तुटीच्या अर्थभरण्याचा मर्यादीत वापर अर्थव्यवस्थेस चालणा देणारा ठरू शकते त्याचा वापर उत्पादन वाढीस, रोजगार निर्मीतीस, संसाधनाचा वापर होण्यास तसेच मागास भागात विकास प्रक्रीया चालू केल्या जाऊ शकतात.

v). तुटीचा अर्थभरणा मूलभूतरित्या भाववाढ घडवून आणणारा असतो. त्यावर योग्य नियंत्रण असते. त्यामुळेच दुसऱ्या पंचवार्षीक योजनेदरम्यान बो. आर. शेणॉय यांनो तुटीच्या अर्थभरण्यास महत्व आहे.

### शिफारसी

i). चलनवाढ लक्षात घेऊनच नवीण चलन निर्मीती केली जातो.

ii). योजना निहाय तुटीची अर्थभरणा सतत वाढत जावू नये.

iii). सकल उत्पादनात वाढ घडवून आणण्यासाठी कृषी, उद्योग सेवा, या तीनही क्षेत्रात आधुनूकीकरण, यांत्रीकी करण झाले पाहिजे.

iv). वित्तीय तुटीच्या माध्यमातून नवीण रोजगार निर्माण झाला पाहिजे.

v). आर्थिक विकास योजना दिर्घकाळात राबविण्यासाठी वित्तीय तुट काही प्रमाणात झालीच पाहिजे

**संदर्भ ग्रंथ सूची**

1. https://marathi.indiatime.com
2. https://cleart.in>fiscal_defict
3. https://www.ndtv.com.budget.doc.
4. https://www.esakal.com fiscal
5. https://www.drishtilas.com fiscal
6. https://bfsi.economictimes, indiatimes.com
7. https://www.loksatta.com
8. https://www.jagranjosh.com
9. https://www.moneycontrol.com
10. भारतीय अर्थव्यवस्था-एज्युकेशनल पब्लीशर्स नागपूर, डॉ. सुखदेव खंदारे
11. भारतीय अर्थव्यवस्था आर.बी.एम.ए. पब्लीकेशन जयपूर, बी.एल. माधूर
12. भारतीय अर्थव्यवस्था एस. चंद प्रकाशन दिल्ली, दत्त सुंदरम
13. भारतीय अर्थव्यवस्था भगीरथ प्रकाशन पुणे, रंजन कोळंबे